# प्रस्तावना

प्रत्येक नागरिकाचा काही ना काही कारणपरत्वे पोलिसांशी संबंध येत असतो. त्याचप्रमाणे पोलिसांनाही वेळोवेळी नागरिकांशी संपर्क साधावा लागतो. समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पोलीस अहोरात्र कार्यरत असतात. जनता व पोलीस यांच्यामध्ये असलेला हा कायमस्वरूपी संपर्क लक्षात घेता दोघांमध्ये सुसंवाद असणे व नागरिकांना याबाबत त्याची जाणीव निर्माण करून देणे अतिशय महत्त्वाचे आहे. पोलीस विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणणे व जनतेस आवश्यक ती मदत व सहकार्य पोलीस विभागाकडून वेळीच उपलब्ध करून देणे, हा 'नागरिकांची सनद' काढण्याबाबतचा उद्देश आहे.

२. या नागरिकांच्या सनदीमध्ये आपल्या महाराष्ट्र पोलीस दलाची रचना, त्याचे मनुष्यबळ, पोलीस ठाण्याचे कामकाज कसे असते, तक्रार कशी नोंदवावी, ही मूलभूत माहिती दिलेली आहे. तसेच रेल्वे प्रवासात येणाऱ्या अडचणी, मोटार अपघात झाल्यास नागरिकांनी काय करावे, या अतिशय उपयुक्त ठरणाऱ्या माहितीचा यात अंतर्भाव करण्यात आलेला आहे. जामीनपात्र व अजामीनपात्र गुन्हा म्हणजे काय, झडती घेण्याची व पंचनामा करण्याबाबतची कार्यपद्धती, पोलीस विभागामार्फत देण्यात येणारे परवाने व इतर कायदेविषयक माहिती यामधून नागरिकांना मिळू शकेल. त्याचप्रमाणे महिलांना उपयुक्त ठरेल अशी महिला अत्याचार प्रतिबंधक कारवाई, बाल गुन्हेगारांना द्यावयाची वागणूक, या प्रमुख बाबींचाही या सदर सनदीमध्ये समावेश केला आहे.

अशा प्रकारे सनद तयार करण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळे यामध्ये काही उणीवा राहण्याची शक्यता आहे. तरी सदर बाबतीत आपल्या काही सूचना असतील तर त्याचे शासनाकडून निश्चित स्वागत होईल.

**व्ही. रंगनाथन**

अपर मुख्य सचिव (गृह)